## मानवी वस्तीत बिबट्या आढळल्यास काय करावे??

- शांत रहाणे, घाबरू नये, गोंगाट करू नये
- हळूच मागे सरकणे त्या प्राण्यात आणि आपल्यात किमान ४०० ते ५०० फूट अंतर ठेवणे
- त्वरित वनविभाग मदत नंबर १९२६ ला किंवा जवळच्या पोलीस स्टेशनला कळविणे
- गर्दी करू नये, त्या प्राण्याला निघून जायला जागा द्यावी
- पिल्ले सापडल्यास अजिबात हाताळू नयेत
- अधिकारी, स्वयंसेवक यांना परिस्थितीवर नियंत्रण मिळवू द्यावे







## बिबट्या आढळणाऱ्या भागात कसे रहावे

- लहान मुले असुरक्षित आसतात आणि त्यांचेकडे नेहमी लक्ष ठेवावे

- उघड्यावर शौचास बसू नये. खाली वाकलेली/ बसलेली व्यक्ती बिबट्याला भक्ष्यसमान वाटू शकते.

- गोठा बळकट करा आणि जनावरांना उघड्यावर बंधू नये.

- बोलणे, गाणे, ओरडणे किंवा ट्रान्झिस्टर वाजवून बिबट्या असलेल्या भागात आपली उपस्थिती जाहीर करवी.

- अडकलेला असल्यास किंवा भक्ष्याजवळ असल्यास बिबट्याला घेरू नये किंवा त्याचा पाठलाग करु नये.

- जंगलांना लागून असलेल्या भागात भटक्या जनावरांची संख्या कमी करने.

- स्थानिक गट / गाव पातळीवरील समुदायांचे प्रबोधन आणि जनजागृती.

Activate Wind
Go to Settings to